**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०९**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- २९/१०/२०२१

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची मा.स्थायी समितीची सभा क्रमांक ०९ सोमवार दिनांक ०१/११/२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील मा.स्थायी समिती सभागृहात मा.अवर सचिव ,नगरविकास विभाग यांच्याकडील दिनांक २२ ऑक्टोबर २०२१रोजीच्या परिपत्रकानुसार सामाजिक अंतर राखुन व अरोग्य विषयक निकषांचे काटेकोर पालन करून प्रत्यक्ष उपस्थितीने खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलाविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे विनंती आहे.

प्र.नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये. अहमदनगर महानगरपालिका.

**सोमवार दिनांक - ०१ /११ /२०२१ ची विषय पत्रिका.**

| विषय क्र. | विषय सुची |
|---|---|
| १३१ | कोव्हीड - १९ कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणकामी करण्यात येणा-या उपाययोजनांअंतर्गत ॲन्टीजेन टेस्ट कीट खरेदी केलेबाबत देयक रू.४,७०,४००/- अदा करणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १३२ | कोव्हीड - १९ कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणकामी करण्यात येणा-या उपाययोजनांअंतर्गत ॲन्टीजेन टेस्ट कीट खरेदी केलेबाबत देयक रू.२३,५२,०००/-अदा करणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १३३ | अहमदनगर महानगरपालिका रस्ता बाजु मांडणी फी व स्लॉटर फी वसुली ई- निविदेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १३४ | कोव्हीड - १९ कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणकामी करण्यात येणा-या उपाययोजनांअंतर्गत ॲन्टीजेन टेस्ट कीट खरेदी केलेबाबत देयक रू.६७,२०,०००/- अदा करणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १३५ | अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी सय्यद इकबाल सुलेमान यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकीरता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १३६ | बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी पडोळे राहून शंकर यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर कारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १३७ | अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४ वसुली वॉर्ड क्र.३९ केडगांव विभाग मधील मालमत्ता धारकांच्या दुबार नोंदी झाल्याने त्यावरील घरपट्टीची आकारणी निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १३८ | अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिी क्र.४वसुली वॉर्ड क्र.४० केडगांव विभाग मधील मालमत्ता धारकांच्या दुबार नोंदी झाल्याने त्यावरील घरपट्टीची आकारणी निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| १३९ | अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४ वसुली वॉर्ड क्र.३४ केडगांव विभाग मधील मालमत्ता धारकांच्या दुबार नोंदी झाल्याने त्यावरील घरपट्टीची आकारणी निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १४० | अहमदनगर महानगरपालिकेची तत्कालीन शहर बससेवा यशवंत ऑटो प्रा.ली.यांचे स्थगित ठेवलेली थकीत अनुदान रक्कम त्यांना परत करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १४१ | (GeM) पोर्टल वरून Back hoe loder for Processing and Disposal (JCB) २ नग जे.सी.बी.मशीन खरेदी बाबत प्रसिध्द Bid Number GEM /२०२१/B/१३६४५२० प्राप्त निविदेतील प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्त्यातील दरास मंजूरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** १] विषय क्रमांक- १३१ ते १४१ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०९**

विषय क्रमांक- १३१ सोमवार दि.०१/११/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** कोव्हीड -१९ कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणकामी करण्यात येणा-या उपाययोजनां अंतर्गत ॲन्टीजेन टेस्ट कीट खरेदी केलेबाबत देयक रू.४,७०,४००/- अदा करणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आरोग्य विभाग

संदर्भ- १. मा.आयुक्त यांची दि.१०/४/२०२१ ची प्रशासकीय मंजुरी

२. Gem पोर्टवरील निविदा क्र. Bid No. Gem/२०२१/B/११४१७१७ दि.२७/३/२०२१

३. आरोग्य विभाग जा.क्र.२५ दि.३/४/२०२१ चा पुरवठा आदेश

उपरोक्त संदर्भाकिंत विषयान्वये अहमदनगर महानगरपालिकेमार्फत कोव्हीड-१९ कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखणेकामी करण्यात येणा-या उपाययोजना करणेकामी आजाराचे लवकरात लवकर निदान करून बाधितांस लवकरात लवकर उपचार करणेकामी Antigen kit ची आवश्यकता आहे.तथापी सध्या Antigen test kit चा साठा कमी प्रमाणात आहे.त्यानुसार मा.शासनाच्या gemपोर्टलवरील निविदा क्र.Bid No.Gem\२०२१ B\ ११४१७१७ दि.२७/०३/२०२१ रोजी निविदा मागविण्यात आली होती.मे.मेरील डायग्नोस्टीक प्रा.ली.मुंबई ही संस्था L१ ठरलेली आहे.त्या अनुषंगाने संदर्भ क्र.३ अन्वये आरोग्य जा.क्र.२५ दि.०३/०४/२०२१ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेला होता.

त्याअनुषंगाने मे.मेरील डायग्नोसटीक प्रा.ली.मुंबई ही संस्था Antigen test kit चा पुरवठा केलेला आहे.त्यानसार सदर संस्थेने रक्कम रू.४२/- प्रमाणे १०००० = रू.४,२०,०००/- वस्तु व सेवा कर १२% रू.५०,४००/- एकुण रक्कम रू. ४,७०,४००/- राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (एस.डी.आर.एफ ) मधून अदा करणेस प्रस्ताव मान्यतेस्तव व आदेशार्थ सविनय सादर. तसेच रू.४२.००/- प्रमाणे दुरूस्ती आदेश काढणेस आदेशार्थ /अ

येणे प्रमाणे आरोग्य विभाग लिपीक यांचा अहवाल असे.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,प्रस्तावित अ प्रमाणे माहे एप्रील बील Antigen test kit खरेदी बाबत बील अदा करणेस शिफारस आहे तथापी आदेशार्थ.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,विभागाने प्रस्तावित केले नुसार अ कार्यवाहीस्तव.

यावर आरोग्य विभाग लिपीक यांचा अभिप्रायक की, मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे अभिप्रायानुसार दुरूस्ती आदेश आज दि.२४/०८/२०२१ रोजी निर्गमित करण्यात आलेले आहेत.तरी प्रस्तावीत केले नुसार देयक अदा करणेस मान्यतेस्तव व आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांची कार्यारंभ आदेश दि.१२/४/२१ असून देयके त्याच कालावधीतील दिसून येतात नव्याने कार्यारंभ आदेश देण्याचे प्रयोजन काय ? आरोग्य जा.क्र.१०९७ दिनांक २४/८/२१ च्या सुधारीत पुरवठा आदेशान्वये gem पोर्ट वरील sanction order मध्ये ॲन्टीजेन टेस्त कीट १०००० चा पुरवठा आदेशात रू ४२ .०० दराप्रमाणे दूरूस्ती बील सादर केले नाही.तसेच पुरवठा आदेश किती कालावधी पर्यत आहे हे नुमुद केले नाही.याची प्र.वैदयकीय अधिक्षक यांनी खात्री करून कार्यवाही करणे संयुक्तीक राहील तथापी खात्री करून फेरसादर करावे.

यावर आरोग्य विभाग लिपीक यांचा अभिप्राय की,फेरसादर,नव्याने कार्यारंभ आदेश प्राप्त कमी दराने देयकांच्या अनुषंगाने केलेले होते.तथापी एकत्रीत कार्यादेश प्राप्त देयकानुसार संस्थेचे आर्थिक नुकसान होणार असल्याने रू.४२.०० प्रमाणे वाचावे तसेच पुरवठा मुदत तातडीची कोव्हीड कालावधी बाब होती .प्रमाणे मान्यतेस्तव व देयक अदा करणेस आदेशार्थ सविनय फेरसादर.

यावर मा.वैदयकीय आरोग्य अधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,

१.कार्यारंभ आदेश जा.क्र.२५ दि.३/४/२१ वैदयकीय आरोग्यअधिकारी यांनी रॅपीड ॲन्टीजेन टेस्ट किट रक्कम रू.४७-०४ प्रतिनग प्रमाणे मेरीन डायगोस्टीक प्रा.ली.या संस्थेला दिलेला कार्यारंभ आदेशानुसार संस्थेने रॅपीड ॲन्टेजीन टेस्त कीट पुरवठा कामी दिलेले देयकरू.४२.०० प्रतीनगाने देयके दिली आहेत.

त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.कार्यारंभ आदेशापेक्षा कमी दराने पुरवठादाराने कोणत्या मेहेरबानीने पुरवठा मनपा अहमदनगर हयास केला हयाचा बोध होत नाही.वास्तवीक संबंधीत पुरवठादारा बरोबर व्यवस्थीत चर्चा केली असती तर त्यापेक्षा कमी दराने मनपास पुरवठा झाला असता परंतु तशा प्रकारे कुठलीही बाब नस्तीवरून दिसून येत नाही.त्याबाबत संबंधीत विभाग प्रमुख हयांचे कडून साधार खुलासा घेण्यात यावा.

२.gem पोर्टवरील दरात आणी पुरवठा आदेशातील दरात तफावत असून संस्थेकडून वाटाघाटी दिसून येत नाही.

३.दोन्ही प्रस्तावाची ॲन्टीजेन टेस्ट कीट ची रक्कम रू.२८,२२,४००/- होत असल्याने महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ मधील प्रकरण -७ कलम ७३(क) प्रमाणे स्थायी समिती आणि महासभा हयांची मंजूरी आवश्यक आहे.त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.सदरची मुळ नस्ती लेखापरिक्षणासाठी सादर करण्यात आली नाही तथापी कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर लेखा परिक्षणाकडे नस्ती पाठवणेचे प्रयोजन काय ? याचा खुलासा करावा.उपरोक्त अटीची पुर्तता करून फेरसादर करावे.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की, २५ लक्ष पेक्षा वाढी देयकाबाबत प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर सादर करण्यात यावा.,

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---***---

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- कोव्हीड -१९ कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणकामी करण्यात येणा-या उपाययोजनां अंतर्गत ॲन्टीजेन टेस्ट कीट खरेदी केलेबाबत देयक रू.४,७०,४००/- अदा करणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभागृहामध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.उपायुक्त श्री डांगे :- किट आपण रू. ४२/- ने घेतल्या एप्रिलमध्ये परत रू. १२८/- किट दिली. एकाच ठेकेदाराने पुरवठा केला आहे.रूग्ण संख्या जास्त झाल्याने आपल्याला कोठेही किट उपलब्ध होत नसल्याने जास्त दराने विकत घ्याव्या लागल्या आहेत.जिल्हा रूग्णालयाने या पेक्षा जादा दराने किट विकत घेतल्या आहेत.

मा.श्री. मुदस्सर शेख :- दोन्ही विषय एकाच ठेकेदाराकडून खरेदी केल्या बाबतचे आहेत. gem पोर्टल वरून खरेदी केली आहे.

मा.उपायुक्त डांगे :- आता सध्या रू.६/- ने किट उपलब्ध आहे.

मा.सभापती साहेब :- रेमीडीसीवीर लोकांनी रू.५०,०००/- त्या काळामध्ये ब्लॉक मध्ये घेतले होते.आपल्याकडे जो स्टॉक आहे. त्याची एक्सापायारी बघून, ज्यांना आवश्यकता आहे. त्या रूग्णांना उपलब्ध करून दया.

मा.श्री. बारस्कर :- एप्रिल, मे मध्ये रू.४२/- नी व जून मध्ये रू.१२८/- दराने खरेदी केली आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावाविषय पत्रिकेवरील विषय क्रमांक १३२ व १३४ हे ॲन्टीजेन टेस्ट कीट खरेदी केले बाबत असल्याने या विषयांना मंजूरी देण्यात यावी.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.तसेच विषय पत्रिकेतील विषय क्रमांक १३२ व १३४ मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- कोव्हीड -१९ कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणकामी करण्यात येणा-या उपाययोजनां अंतर्गत ॲन्टीजेन टेस्ट कीट खरेदी करणे करीता मा.शासनाच्या gemपोर्टलवरील निविदा क्र.Bid No.Gem\२०२१ B\ ११४१७१७ दि.२७/०३/२०२१ निविदे नुसार मे.मेरील डायग्नोसटीक प्रा.ली.मुंबई यांच्या कडील दरास व वेळोवेळी केलेल्या मागणी नुसार सादर केलेल्या दरास व झालेल्य खर्चास, राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (एस.डी.आर.एफ ) या लेखाशिर्ष मधून अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.तसेच विषय पत्रिकेवरील विषय क्रमांक १३२ व १३४ हे ॲन्टीजेन टेस्ट कीट खरेदी केलेबाबत असल्याने या विषयांना मंजूरी देण्यात येत आहे.

**<u>ठराव</u>** :- ऑफिस रिपोर्ट नुसार कोव्हीड -१९ कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणकामी करण्यात येणा-या उपाययोजनां अंतर्गत ॲन्टीजेन टेस्ट कीट खरेदी करणे करीता मा.शासनाच्या gemपोर्टलवरील निविदा क्र.Bid No.Gem\२०२१ B\ ११४१७१७ दि.२७/०३/२०२१ निविदे नुसार मे.मेरील डायग्नोसटीक प्रा.ली.मुंबई यांच्या कडील दरास व वेळोवेळी केलेल्या मागणी नुसार सादर केलेल्या दरास व झालेल्या खर्चास, राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (एस.डी.आर.एफ ) या लेखाशिर्ष मधून अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

अनुमोदक :- मा.श्री.समद खान सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०९**

विषय क्रमांक- १३२ सोमवार दि.०१/११/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** कोव्हीड - १९ कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणकामी करण्यात येणा-या उपाययोजनांअंतर्गत ॲन्टीजेन टेस्ट कीट खरेदी केलेबाबत देयक रू.२३,५२,०००/-अदा करणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आरोग्य विभाग

संदर्भ- १. मा.आयुक्त यांची दि.१०/४/२०२१ ची प्रशासकीय मंजुरी

२. Gem पोर्टवरील निविदा क्र. Bid No. Gem/२०२१/B/११४१७१७ दि.२७/३/२०२१

३. आरोग्य विभाग जा.क्र.११३ दि.१२/४/२०२१ चा पुरवठा आदेश

उपरोक्त संदर्भाकिंत विषयान्वये अहमदनगर महानगरपालिकेमार्फत कोव्हीड-१९ कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखणेकामी करण्यात येणा-या उपाययोजना करणेकामी आजाराचे लवकरात लवकर निदान करून बाधितांस लवकरात लवकर उपचार करणेकामी Antigen test kit ची आवश्यकता आहे.तथापी सध्या Antigen test kit चा साठा कमी प्रमाणात आहे.त्यानुसार मा.शासनाच्या gemपोर्टलवरील निविदा क्र.Bid No.Gem\२०२१ B\ ११४१७१७ दि.२७/०३/२०२१ रोजी निविदा मागविण्यात आली होती.मे.मेरील डायग्नोस्टीक प्रा.ली.मुंबई ही संस्था L१ ठरलेली आहे.त्या अनुषंगाने संदर्भ क्र.३ अन्वये आरोग्य जा.क्र.११३ दि.१२/०४/२०२१ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेला होता.

त्याअनुषंगाने मे.मेरील डायग्नोसटीक प्रा.ली.मुंबई ही संस्था Antigen test kit चा पुरवठा केलेला आहे.त्युनसार सदर संस्थेने रक्कम रू.४२/- प्रमाणे ५०००० = रू.२१,००,०००/- वस्तु व सेवा कर १२% रू.२,५२,०००/- एकुण रक्कम रू. २३,५२,०००/- राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (एस.डी.आर.एफ ) मधून अदा करणेस प्रस्ताव मान्यतेस्तव व आदेशार्थ सविनय सादर.तसेच सुधारित दुरूस्ती आदेश रूपये ४२.००/- प्रमाणे काढणेस आदेशार्थ /अ

येणे प्रमाणे आरोग्य विभाग लिपीक यांचा अहवाल असे.

यावर मा. वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचा अभिप्राय की,प्रस्तावित अ प्रमाणे माहे एप्रील २०२१मधील Antigen test kit खरेदी पोटी बील अदा करणेस शिफारस आहे.

यावर लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, रूपये ४२.०० दराबाबत पुरवठा आदेश दुरूस्ती केला नाही याची खात्री कडुन प्र.वैद्यकीय अधिकारी यांनी शिफारस केलेनुसार कार्यवाहीस्तव सादर

यावर आरोग्य विभाग लिपिक यांचा अभिप्राय की, फेरसादर , मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे अभिप्रायानुसार दुरूस्ती आदेश आज दि.२४/८/२०२१ रोजी निर्गमीत करण्यात आलेले आहेत. तरी प्रस्तावीत केलेनुसार देयका अदा करणेस मान्यतेस्तव व आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.लेखापरिक्षक / मुख्यलेखाधिकरी यांची अभिप्राय की, कार्यारंभ आदेश दि.१२/४/२१ असून देयके त्याच कालावधीतील दिसून येतात नव्याने कार्यारंभ आदेश देण्याचे प्रयोजन काय ? याबाबत साधार खुलासा करावा. आरोग्य जा.क्र.१०९७ दिनांक २४/८/२१ च्या सुधारीत पुरवठा आदेशानुसार वैद्यकीय आरोग्याधिकारी यांचे फेरसादर खुलासा प्रमाणे कार्यवाही करणे संयुक्तीक राहील. तसेच प्रस्तावासोबत सादर केलेले टॅक्स इनव्हाईस देयकाची झ रॉक्स जोडली आहे याची विभागाने खात्री करावी पुरवठा आदेश किती कालावधीचा आहे नमूद केले नाही खात्रीकडून फेरसादर करावे.

यावर आरोग्य विभाग लिपीक यांचा अभिप्राय की,फेरसादर,नव्याने कार्यारंभ आदेश प्राप्त कमी दराचे देयकांच्या अनुषंगाने दिलेले होते.तथापी एकत्रीत कार्यादेश प्राप्त देयकानुसार संस्थेचे आर्थिक नुकसान नसल्याने रू.४२.०० प्रमाणे वाचावे तसेच पुरवठा मुदत तातडीची कोव्हीड कालावधीमधील बाब होती .प्रमाणे मान्यतेस्तव व देयके अदा करणेस आदेशार्थ सविनय फेरसादर./अ

यावर मा.वैदयकीय आरोग्य अधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,

१.कार्यारंभ आदेश जा.क्र.२५ दि.३/४/२१ वैदयकीय आरोग्यअधिकारी यांनी रॅपीड ॲन्टीजेन टेस्ट किट रक्कम रू.४७.०४ प्रतिनग प्रमाणे मेरीन डायगोस्टीक प्रा.ली.या संस्थेला दिलेला कार्यारंभ आदेशानुसार संस्थेने रॅपीड ॲन्टेजीन टेस्ट कीट पुरवठा कामी दिलेले देयक रू.४२.०० प्रती नग दराने देयके दिले आहे.त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.कार्यारंभ आदेशापेक्षा कमी दराने पुरवठादाराने कोणत्या मेहेरबानीने पुरवठा मनपास अहमदनगर हयास केला हयाचा बोध होत नाही.वास्तवीक संबंधीत पुरवठादारा बरोबर व्यवस्थीत चर्चा केली असती तर त्यापेक्षा कमी दराने मनपास पुरवठा झाला असता परंतु तशा प्रकारे कुठलीही बाब नस्तीवरून दिसून येत नाही.त्याबाबत संबंधीत विभाग प्रमुख हयांचे कडून साधार खुलासा घेण्यात यावा.

२.gem पोर्टवरील दरात आणी पुरवठा आदेशातील दरात तफावत असून संस्थेकडून वाटाघाटी दिसून येत नाही.

३.दोन्ही प्रस्तावाची ॲन्टीजेन टेस्ट कीट ची रक्कम रू.२८,२२,४००/- होत असल्याने महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ मधील प्रकरण -७ कलम ७३(क) प्रमाणे स्थायी समिती आणि महासभा मंजूरी घेणे आवश्यक आहे. सदरची नस्ती लेखापरिक्षणासाठी सादर करण्यात आली नाही तथापी कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर लेखा परिक्षणाकडे नस्ती पाठवणेचे प्रयोजन काय ? याचा खुलासा करावा. उपरोक्त अटीची पुर्तता करून फेरसादर करावे.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की, मुख्यलेखापरिक्षक यांचे दि.२१/९ चे (१) व (२) मधील अभिप्राय जर.. तर .. च्या भाषेतील आहेत. , मुद्दा क्र.३ नुसार २५ लक्ष रू. किंमतीच्या आतील देयक मा.आयुक्त साो. यांचे अधिकार कक्षेत येत असुन विभागाने वाढीवचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर ठेवावा., २३.५२ लक्ष बिल देण्यासाठी मान्यतेसाठी सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---**---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- कोव्हीड -१९ कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणकामी करण्यात येणा-या उपाययोजनां अंतर्गत ॲन्टीजेन टेस्ट कीट खरेदी केलेबाबत देयक रू.४,७०,४००/- अदा करणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभागृहामध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.उपायुक्त श्री डांगे :- किट आपण रू. ४२/- ने घेतल्या एप्रिलमध्ये परत रू. १२८/- किट दिली. एकाच ठेकेदाराने पुरवठा केला आहे.रूग्ण संख्या जास्त झाल्याने आपल्याला कोठेही किट उपलब्ध होत नसल्याने जास्त दराने विकत घ्याव्या लागल्या आहेत.जिल्हा रूग्णालयाने या पेक्षा जादा दराने किट विकत घेतल्या आहेत.

मा.श्री. मुदस्सर शेख :- दोन्ही विषय एकाच ठेकेदाराकडून खरेदी केल्या बाबतचे आहेत. gem पोर्टल वरून खरेदी केली आहे.

मा.उपायुक्त डांगे :- आता सध्या रू.६/- ने किट उपलब्ध आहे.

मा.सभापती साहेब :- रेमीडीसीवीर लोकांनी रू.५०,०००/- त्या काळामध्ये ब्लॉक मध्ये घेतले होते.आपल्याकडे जो स्टॉक आहे. त्याची एक्सापायारी बघून, ज्यांना आवश्यकता आहे. त्या रूग्णांना उपलब्ध करून दया.

मा.श्री. बारस्कर :- एप्रिल, मे मध्ये रू.४२/- नी व जून मध्ये रू.१२८/- दराने खरेदी केली आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावाविषय पत्रिकेवरील विषय क्रमांक १३२ व १३४ हे ॲन्टीजेन टेस्ट कीट खरेदी केले बाबत असल्याने या विषयांना मंजूरी देण्यात यावी.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.तसेच विषय पत्रिकेतील विषय क्रमांक १३२ व १३४ मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- कोव्हीड -१९ कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणकामी करण्यात येणा-या उपाययोजनां अंतर्गत ॲन्टीजेन टेस्ट कीट खरेदी करणे करीता मा.शासनाच्या gemपोर्टलवरील निविदा क्र.Bid No.Gem\२०२१ B\ ११४१७१७ दि.२७/०३/२०२१ निविदे नुसार मे.मेरील डायग्नोसटीक प्रा.ली.मुंबई यांच्या कडील दरास व वेळोवेळी केलेल्या मागणी नुसार सादर केलेल्या दरास व झालेल्य खर्चास, राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (एस.डी.आर.एफ ) या लेखाशिर्ष मधून अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.तसेच विषय पत्रिकेवरील विषय क्रमांक १३२ व १३४ हे ॲन्टीजेन टेस्ट कीट खरेदी केलेबाबत असल्याने या विषयांना मंजूरी देण्यात येत आहे.

**ठराव** :- ऑफिस रिपोर्ट नुसार कोव्हीड -१९ कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणकामी करण्यात येणा-या उपाययोजनां अंतर्गत ॲन्टीजेन टेस्ट कीट खरेदी करणे करीता मा.शासनाच्या gemपोर्टलवरील निविदा क्र.Bid No.Gem\२०२१ B\ ११४१७१७ दि.२७/०३/२०२१ निविदे नुसार मे.मेरील डायग्नोसटीक प्रा.ली.मुंबई यांच्या कडील दरास व वेळोवेळी केलेल्या मागणी नुसार सादर केलेल्या दरास व झालेल्या खर्चास, राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (एस.डी.आर.एफ ) या लेखाशिर्ष मधून अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

अनुमोदक :- मा.श्री.समद खान सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०९**

विषय क्रमांक- १३३ सोमवार दि.०१/११/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका रस्ता बाजु मांडणी फी व स्लॉटर फी वसुली ई-निविदेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका मार्केट विभाग

उपरोक्त विषयांन्वये विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की,रस्ताबाजु मांडणी फी व स्लॉटर फी वसुलीची खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे चार वेळा निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.

| अ.क्र. | निविदा क्र. | प्राप्त निविदा |
|---|---|---|
| १ | ANMC - ६३५४९४-१ | १ |
| २ | ANMC - ६७४७१५-१ | ० |
| ३ | ANMC -६९७१२३-१ | ० |
| ४ | ANMC -७०४९५८-१ | १ |

रस्ताबाजु मांडणी फी व स्लॅटर फी वसुलीची वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे चार वेळा निविदा प्रसिध्द केली असता ई - निविदा क्र. ANMC -७०४९५८-१ मध्ये श्री.छत्रपती शिवाजी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था,सिडको ता.जि.नांदेड यांची निविदा प्राप्त झाली असून त्यांचा तांत्रिक लिफाफ्याचा तक्ता खालील प्रमाणे

| अ. क्र. | तांत्रिक लिफाफयामध्ये आवश्यक कागदपत्रे | श्री.छत्रपती शिवाजी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था |
|---|---|---|
| १ | मागील तीन वर्षाचे लेखाविवरण पत्राच्या प्रती जोडावी | जोडले आहे. |
| २ | पॅन कार्डची साक्षाकीत प्रतीक्षा जोडावी | जोडले आहे. |
| ३ | शॅप ॲक्ट लायसन्स | जोडले आहे. |
| ४ | निविदाधारकास रस्ता बाजु मांडणी फीव स्लॉटर फी वसुल करण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.त्याबाबतचे कागदपत्रे जोडावेत. | निविदाधारकाने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका ,नांदेड यांचा रस्ता बाजु मांडणी फी व स्लॉटर फी वसुल करण्याचा कार्यारंभ आदेश जोडला आहे. |
| ५ | बयाणा रक्कम | भरली आहे. |

वरील प्रमाणे तांत्रिक लिफाफ्यातील कागदपत्रांची दि.१/९/२०२१ रोजी मा.छाननी समितीने छाननी केली असुन कागदपत्रे यथायोग्य असल्याने मा.छाननी समितीच्या मान्यतेने व्यापारी लिफाफा उघडण्यात आला असुन तो खालील प्रमाणे.

| **अ. क्र** | **नांव** | **मनपाने निश्चित केलेली ई-निविदेतील देकार रक्कम** | **ठेकेदाराने ई - निविदेत नमुद देकार रक्कम** |
|---|---|---|---|
| **१** | श्री.छत्रपती शिवाजी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था.सिडको,ता.जि.नांदेड | **४३,५६,०००/-** | **४६,९०,२५०/-** |

तरी रस्ताबाजु मांडणी फी व स्लॉटर फी वसुलीची ई - निविदा क्र. ANMC -७०४९५८-१ मध्ये श्री.छत्रपती शिवाजी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था.सिडको,ता.जि.नांदेड यांनी देकार रक्कम रू. ४६,९०,२५०/- देण्याचे मान्य केले आहे.तरी सदरचा ठेका निविदेतील अटी व शर्तीनुसार एक वर्ष कालावधीकरीता श्री.छत्रपती शिवाजी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था.सिडको,ता.जि.नांदेड यांस देणेबाबत सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे निर्णयास्तव पाठविणेबाबत रिपोर्ट आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे मार्केट विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित अ प्रमाणे सदरचा प्रस्ताव मा.स्थयी समितीकडे पाठविण्याबाबत आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे मान्यतेसाठी सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---**---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका रस्ता बाजु मांडणी फी व स्लॉटर फी वसुली ई- निविदा मंजुरी बाबतचा विषय आहे.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.मुदस्सर शेख :- मागच्या वेळी देकार रक्कम किती होती.

मार्केट विभाग प्रमुख श्री.सोनावणे :- अंदाजे २५ लक्ष रूपये होती.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- चालू टेंडर मध्ये किती देकार रक्कम निश्चीत करण्यात आली.

मार्केट विभाग प्रमुख श्री.सोनावणे :- रू.४३लाख ५६ हजार रक्कम निश्चीत करण्यात आली आहे.चार वेळा निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.तीन वेळा फेर निविदा प्रसिध्द करण्यात आली.चौथ्यावेळी सदर एकच निविदा प्राप्त झाली आहे.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- माझ्या माहितीप्रमाणे सदर ठेकेदाराने निविदेतील देकार रकमेवर काम करण्यास तयार नसल्याचे पत्र दिल्याचे समजते.

मा.श्री.श्याम नळकांडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट नुसार रस्ताबाजु मांडणी फी व स्लॉटर फी वसुलीची ई - निविदा क्र. ANMC -७०४९५८-१ मध्ये श्री.छत्रपती शिवाजी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था.सिडको,ता.जि.नांदेड यांनी देकार रक्कम रू. ४६,९०,२५०/- देण्याचे मान्य केले असल्याने निविदेतील अटी व शर्तीनुसार एक वर्ष कालावधीकरीता श्री.छत्रपती शिवाजी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था.सिडको,ता.जि.नांदेड यांच्या देकार रकमेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार रस्ताबाजु मांडणी फी व स्लॉटर फी वसुलीची ई - निविदा क्र. ANMC -७०४९५८-१ मध्ये श्री.छत्रपती शिवाजी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था.सिडको,ता.जि.नांदेड यांनी देकार रक्कम रू. ४६,९०,२५०/- देण्याचे मान्य केले असल्याने निविदेतील अटी व शर्तीनुसार एक वर्ष कालावधीकरीता श्री.छत्रपती शिवाजी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था.सिडको,ता.जि.नांदेड यांच्या देकार रकमेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.श्याम नळकांडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.समद खान सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०९**

विषय क्रमांक- १३४ सोमवार दि.०१/११/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** कोव्हीड - १९ कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणकामी करण्यात येणा-या उपाययोजनांअंतर्गत ॲन्टीजेन टेस्ट कीट खरेदी केलेबाबत देयक रू.६७,२०,०००/- अदा करणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**संदर्भ :- १.**मा.आयुक्त यांची दि.१०/०४/२०२१ ची प्रशासकिय मंजूरी.

२.gem पोर्टलवरील निविदा क्र.Bid No.Gem/२०२१ /B/ ११४१७१७ दि.२७/०३/२०२१

३. आरोग्य विभाग जा.क्र.३३१ दि.११/०५/२०२१ चा पुरवठा आदेश

४.आरोग्य विभाग जा.क्र.७६८ दि.२५/०६/२०२१ चा पुरवठा आदेश

५. आरोग्य विभाग जा.क्र.१११५ दि.३०/०८/२०२१ अन्वये निधी मागणी पत्र.

उपरोक्त संदर्भाकित विषयान्वये ,अहमदनगर महानगरपालिकेमार्फत कोव्हिड -१९ कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणेकामी करण्यात येणा-या उपाययोजना करणेकामी ,आजाराचे लवकरात लवकर निदान करून बाधितांस लवकरात लवकर उपचार करणेकामी Antigen test kit ची आवश्यकता होती.त्यानुसार मा.शासनाच्या gemपोर्टलवरील निविदा क्र. Bid No.Gem/२०२१ /B/ ११४१७१७ दि.२७/०३/२०२१ रोजी निविदा मागविण्यात आली होती. मे.मेरील डायग्नोस्टीक प्रा.ली.मुंबई या संस्थेने Antigen test kit चा पुरवठा केलेला होता.त्यानुसार सदर संस्थेने रक्कम रू.१२८ प्रमाणे ५००००=रू.६४,००,०००/- वस्तु व सेवा कर ५ टक्के रू.३,२०,०००/- एकुण रक्कम रू.६७,२०,०००/- देयक सादर केलेले होते.सदर देयके अदा करणेकामी सध्या प्राप्त राज्य प्रतिसाद निधीमध्ये शिल्लक तरतुद नसल्यामुळे ,संदर्भ क्र.५ अन्वये प्रस्तावीत राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (एस.डी.आर.एफ) मधून सदर देयके अदा करणेस मंजुरीस्तव सदरचा विषय मा.स्थायी समितीपुढे ठेवणकामी आदेशार्थ प्रस्ताव सविनय सादर. येणे प्रमाणे लिपीक,आरोग्य विभाग यांचा अहवाल असे.

यावर वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचा अभिप्राय की,प्रस्तावित अ प्रमाणे Antigen test kit पुरवठा पोटभ प्राप्त देयके अदा करणेस मान्यतेस्तव तथापी आदशार्थ सविनय सादर.

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,प्रस्तावात नमुद केले प्रमाणे संदर्भ क्र.३,४ नुसार Antigen test kit पुरवठा केले कामी रू.१२८/- दरानुसार चे पत्र दिसून येत नाही.तसेच निधी उपलब्धते बाबतचे पत्र दिसून येत नाही.याची खात्री करून निधी उपलब्धते बाबत मुलेअ यांचे अभिप्राय घेवून मा.स्थायी समितीकडे ठेवणेकामी कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,स्थायी समिती समोर सादर करणेस मान्यता मिळणेबाबत सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- कोव्हीड -१९ कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणकामी करण्यात येणा-या उपाययोजनां अंतर्गत ॲन्टीजेन टेस्ट कीट खरेदी केलेबाबत देयक रू.४,७०,४००/- अदा करणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभागृहामध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.उपायुक्त श्री डांगे :- किट आपण रू. ४२/- ने घेतल्या एप्रिलमध्ये परत रू. १२८/- किट दिली. एकाच ठेकेदाराने पुरवठा केला आहे.रूग्ण संख्या जास्त झाल्याने आपल्याला कोठेही किट उपलब्ध होत नसल्याने जास्त दराने विकत घ्याव्या लागल्या आहेत.जिल्हा रूग्णालयाने या पेक्षा जादा दराने किट विकत घेतल्या आहेत.

मा.श्री. मुदस्सर शेख :- दोन्ही विषय एकाच ठेकेदाराकडून खरेदी केल्या बाबतचे आहेत. gem पोर्टल वरून खरेदी केली आहे.

मा.उपायुक्त डांगे :- आता सध्या रू.६/- ने किट उपलब्ध आहे.

मा.सभापती साहेब :- रेमीडीसीवीर लोकांनी रू.५०,०००/- त्या काळामध्ये ब्लॉक मध्ये घेतले होते.आपल्याकडे जो स्टॉक आहे. त्याची एक्सापायारी बघून, ज्यांना आवश्यकता आहे. त्या रूग्णांना उपलब्ध करून दया.

मा.श्री. बारस्कर :- एप्रिल, मे मध्ये रू.४२/- नी व जून मध्ये रू.१२८/- दराने खरेदी केली आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावाविषय पत्रिकेवरील विषय क्रमांक १३२ व १३४ हे ॲन्टीजेन टेस्ट कीट खरेदी केले बाबत असल्याने या विषयांना मंजूरी देण्यात यावी.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.तसेच विषय पत्रिकेतील विषय क्रमांक १३२ व १३४ मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- कोव्हीड -१९ कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणकामी करण्यात येणा-या उपाययोजनां अंतर्गत ॲन्टीजेन टेस्ट कीट खरेदी करणे करीता मा.शासनाच्या gemपोर्टलवरील निविदा क्र.Bid No.Gem\२०२१ B\ ११४१७१७ दि.२७/०३/२०२१ निविदे नुसार मे.मेरील डायग्नोसटीक प्रा.ली.मुंबई यांच्या कडील दरास व वेळोवेळी केलेल्या मागणी नुसार सादर केलेल्या दरास व झालेल्य खर्चास, राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (एस.डी.आर.एफ ) या लेखाशिर्ष मधून अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.तसेच विषय पत्रिकेवरील विषय क्रमांक १३२ व १३४ हे ॲन्टीजेन टेस्ट कीट खरेदी केलेबाबत असल्याने या विषयांना मंजूरी देण्यात येत आहे.

**ठराव** :- ऑफिस रिपोर्ट नुसार कोव्हीड -१९ कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणकामी करण्यात येणा-या उपाययोजनां अंतर्गत ॲन्टीजेन टेस्ट कीट खरेदी करणे करीता मा.शासनाच्या gemपोर्टलवरील निविदा क्र.Bid No.Gem\२०२१ B\ ११४१७१७ दि.२७/०३/२०२१ निविदे नुसार मे.मेरील डायग्नोसटीक प्रा.ली.मुंबई यांच्या कडील दरास व वेळोवेळी केलेल्या मागणी नुसार सादर केलेल्या दरास व झालेल्या खर्चास, राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (एस.डी.आर.एफ ) या लेखाशिर्ष मधून अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

अनुमोदक :- मा.श्री.समद खान सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०९**

विषय क्रमांक- १३५ सोमवार दि.०१/११/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी सय्यद इकबाल सुलेमान यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकीरता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ- इलेक्ट्रीक विभाग यांचेकडील जा.क्र.२८१ दि.२०/०९/२०२१ अन्वयेचा प्रस्ताव.

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की,इलेक्ट्रीक विभाग यांनी त्यांचेकडील जा.क्र.इलेक्ट्रीक विभाग २८१ दि.२०/९/२०२१ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये इलेक्ट्रीक विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी सय्यद इकबाल सुलेमान यांचा अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि.०९/४/२०२१ ते ०८/१०/२०२१ अखरे सहा महिन्याकरिता असुन सदरची मुदत ही दि.०९/१०/२०२१ रोजी पासून समाप्त होणार असल्याने त्यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरिता मानधनावर पुर्ननियुक्ती करणेबाबत सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा.स्थायी समिती ठराव क्र.१४ दिनांक ०८/०४/२०२१ अन्वयेच्या मान्यता पारित ठरावानुसार जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक १५०६ दि.२७/०५/२०२१ अन्वये इलेक्ट्रीक विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी सय्यद इकबाल सुलेमान यांची रू. १४२५०/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन दि.०९/०४/२०२१ पासून सहा महिन्याकरिता मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर नियुक्तीची मुदत ही दि.०९/१०/२०२१ रोजी पासुन समाप्त होणार आहे./अ

तरी इलेक्ट्रीक विभाग यांचेकडील वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ च्या तरतुदीनुसार इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन सय्यद इकबाल सुलेमान यांची पुढील सहा महिन्याकरिता अटी व शर्ती प्रमाणे रूपये १४,२५०/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणेकामी निर्णयासाठी सादर करणे करीता मा. मुख्य लेखाधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवून सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर./ब

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर लेखापरिक्षक / मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा.शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.-२००५/प्र.क्र.४७/०५/१२ दिनांक २५ ऑगस्ट २००५ मधील परिच्छेद ५ मध्ये सर्व पदावरील नियुक्ती विहीत मार्गाने / माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी. अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या /अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्या तर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी असे नमूद केले आहे. प्रस्तावीत वायरमन पदी पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकल करून उचित कार्यवाही करण्यात यावी.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत "अ" नुसार अहवाल व "ब" मधील मुलेप यांचे अभिप्रायानुसार मा.स्थायी समितीकडे पाठविण्यास सादर.

यावर मा. अति. आयुक्त सो. यांची अभिप्राय की, इलेक्ट्रीक विभागातील मानधनावर ६ महिन्याकरिता पुर्ननियुक्तीचा प्रस्ताव ६ महिन्याकरिता न पाठविता ज्या कालावधीकरिता आवश्यकता आहे तोपर्यत किंवा ६ महिने जे अगोदर असेल त्या कालावधी करीता पुर्ननियुक्तीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी सय्यद इकबाल सुलेमान यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकीरता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभागृहामध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- श्री. वैभव जोशी यांची नियुक्ती इले. विभागात झाली आहे. विदयुत विभागात होणा-या कामाची जबाबदार म्हणून विभाग प्रमुखावर जबाबदारी असते.

मा. अति.आयुक्त श्री. प्रदीप पठारे :- विभाग प्रमुख म्हणून त्यांचीच जबाबदारी आहे.

मा.सभापती साहेब :- मानधनावरिल कर्मचारी शिवप्रकाश व तिवारी बाबत पण खुप तक्रारी आला. जागेवर बसून काम करतात.

मा. उपायुक्त (कर) श्री.यशवंत डांगे :- श्री. वैभव जोशी यांची नियुक्ती इले. विभागात झाली आहे. इलेक्ट्रीच काम करत नाही. जोशी तुम्ही चार्ज घेतला मग नगररचनाकार म्हणून सहया करता विभाग प्रमुख सही करत नाही.

मा.श्री. सागर बोरूडे :- तुमची विदयुत विभाग प्रमुख नेमणूक केली

इले. विभाग श्री. जोशी :- अस कोणताही पद नाही.

श्री. क्षेत्रे :- विदयुत विभागाकडे ८ लोक आहेत त्यापैकी ३ लोक सुपरवायझरच काम करतात.

मा.सभापती साहेब :- विदयुत व्यवस्था देखभाल व दुरूस्ती करिता ठेकेदार संस्थेची नेमणूक केली आहे. आता आपण मानधनावरचे लोक तुम्हाला लागतात का?

श्री. क्षेत्रे :- हो साहेब लोक लागतील आपल्याला कमी वायरमन आहे.

मा.सभापती साहेब :- आपल्याला लोक लागणार आहे. मानधनावरचे लोक काम पण चांगल करतात LAD साठी लोक लागणार आहे. डांगे साहेब छत्रपती शिवाजी महाराज पुतळयाजवळ ठेकेदाराने बसविलेल्या दिव्याचा प्रकाश खुप कमी पडतो किती वॅाटचे आहेत. LAD चा प्रकाश कमी पडतो. ३० वॅट ऐवजी ६० वॅट चा लावावा लागणार आहे.

मा.उपायुक्त (कर) श्री. यशवंत डांगे :- कमी प्रकाश आहे. ३० वॅटचे आहेत.

मा.सभापती साहेब :- ६० वॅट चे दिवे लावावेत.

मा. अति.आयुक्त श्री. प्रदीप पठारे :- शहराच्या मुख्य व प्रमुख रस्त्यावर ६० वॅटचे लावावे.

मा.श्री. मुदस्सर शेख :- ३०,४० वॅटचे गल्ली बोळात लावावेत.

मा.श्री. मनोज कोतकर :- होत असेल तर करा. नाहीतर विदयुत विभागाने विदयुत मेटरिअय मागवून आपल बसवून दया.

मा. अति.आयुक्त श्री. प्रदीप पठारे :- ११० व ७० वॅट मुख्य रस्त्यावर लावल्यास भरपुर प्रकाश पडेल.

मा.श्री. मनोज कोतकर :- बॉक्समध्ये एक वस्तू दाखवली आणि नंतर देताना दुसरी दिली.
मा.उपायुक्त (कर) श्री. यशवंत डांगे :- कमी प्रकाश आहे.
मा.श्री. सागर बोरूडे :- वॉर्डमधे् वायरमन व गाडी पण नाही.
मा.श्री. सचिन शिंदे :- ठेकेदार संस्थेची टिम दिवाळी नंतर येणार आहे.
मा.सभापती साहेब :- ज्या लाईट नगरसेवकांच्या वॉर्डात बंद आहे.त्या प्रथम चालू करण्यात याव्यात.
मा.श्री.सचिन शिंदे :- कल्याण रोडला लाईट बंद आहे.
मा.श्री. प्रकाश भागानगरे :- लोक म्हणतात ही दिवाळी पण आमची अंधारात का ?
मा. अति.आयुक्त श्री. प्रदीप पठारे :- श्री. वैभव जोशी तुमचे पद काय
इले. विभाग श्री. जोशी :- सहाय्यक उपअभियंता
मा. अति.आयुक्त श्री. प्रदीप पठारे :- तुम्हाला प्रभारी उपअभियंता , विदयुत विभाग या पदाचा अतिरिक्त कार्यभार आशी दुरूस्ती ऑर्डर देण्यात येईल.
मा.श्री.श्याम नळकांडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.
मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.
मा.सभापती साहेब **:-** अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी सय्यद इकबाल सुलेमान यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकीरता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट मान्य करण्यात येत आहे.

**ठराव :-**ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी सय्यद इकबाल सुलेमान यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकीरता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्टास मान्यता देण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री. श्याम नळकांडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.समद खान सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०९**

विषय क्रमांक- १३६ सोमवार दि.०१/११/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी पडोळे राहून शंकर यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर कारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ- बांधकाम विभाग यांचेकडील जा.क्र.१६१३ दि.१३/१०/२०२१ अन्वयेचा प्रस्ताव

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, बांधकाम विभाग यांनी त्यांचेकडील जा.क्र.१६१३ दि.१३/१०/२०२१ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये बांधकाम विभागाकरिता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी पडोळे राहुल शंकर यांचा अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि.१९/०६/२०२१ ते १८/१२/२०२१ अखेर सहा महिन्याकरिता असुन सदरची मुदत ही दि.१९/१२/२०२१ रोजी पासून समाप्त होणार असल्याने बांधकाम विभागामध्ये कामकाजाचे स्वरूप पहाता आवश्यकता असल्याने त्यांना पुढील सहा महिन्याकरिता मानधनावर पुर्ननियुक्ती करणेबाबत सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा.स्थायी समिती ठराव क्र. ५१ दिनांक २६/०७/२०२१ अन्वयेच्या पुर्व मंजुरी पारित ठरावाच्या अनुषंगाने जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक २८७९ दि. ०२/०९/२०२१ अन्वये बांधकाम विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील ) यापदी पडोळे राहुल शंकर यांची रू. २५,०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन दि.१६/१२/२०२० पासून सहा महिन्याकरिता अटी व शर्तीप्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन सदर कालावधीतील केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत ही दिनांक १९/१२/२०२१ रोजी पासून समाप्त होणार आहे.

तरी संदभिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ च्या तरतुदीनुसार बांधकाम विभागासाठी करारानुसार खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबंधितांची तात्पुरत्या स्वरूपात नमुद केलेल्या दरमहा मानधनावर त्यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन दिनांक २२/१२/२०२१ पासून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबत मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणेकामी निर्णयाकरिता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर./अ

| अ.क्र. | नाव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रूजू होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | पडोळे राहुल शंकर | कनिष्ठ अभियंता (सिव्हील) | २५,०००/- | बांधकाम विभाग |

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांची अभिप्राय की, प्रस्तावीत "अ" प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अति. आयुक्त यांची अभिप्राय की, "अ" मध्ये प्रस्तावीत केल्यानुसार मा.स्थायी समितीकडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी पडोळे राहून शंकर यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर कारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभागृहामध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.श्याम नळकांडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब **:-** बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी पडोळे राहून शंकर यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर कारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट मान्य करण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>**ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी पडोळे राहून शंकर यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर कारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्टास मान्यता देण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री. श्याम नळकांडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.समद खान सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०९**

विषय क्रमांक- १३७ सोमवार दि.०१/११/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४ वसुली वॉर्ड क्र.३९ केडगांव विभाग मधील  मालमत्ता धारकांच्या दुबार नोंदी झाल्याने त्यावरील घरपट्टीची आकारणी निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका केडगांव उपकार्यालय.

विनंती रिपोर्ट वॉर्ड क्र.३९ मध्ये सन २००३/२००४ या आर्थिक वर्षात अहमदनगर महानगरपालिकेने मालमत्ता कर आकारणी साठी संपर्ण अहमदनगर हशरातील मिळकतीचे रिव्हीजन सवर्हे केला होता,त्यावहळी संबंधीतरिव्हीजन ऑफिसर /असि,सिव्हीजन ऑफिसर यांनी अस्तित्वात असणा-या घरांच्या नोदी मालमत्ता कर आकारणी साठी घतल्या होत्या,त्याच बरोबार रिव्हीजन सर्वे मध्ये खुल्या भुखंडाच्या नोंदी(मोकळी प्लॉट) गाव पातळी वरिल तलाठी कार्यालय येथुन मिळकतीचे सर्व्हे नंबर व प्लॉट नंबर यांची कागदोपत्री माहिती संकलीत करून खुल्या भुखंडाच्या देखिल नोंदी घेण्यात आल्या परंतु यामध्ये ज्या मिळकतीच्या घरांच्या नोंदी मालमत्ता कर आकारणीसाठी घेण्यात आल्या त्यात काही त्याच मिळकतीच्या नोंदी खुल्या भुखंड मोकळी जागा म्हणून घेण्यात आल्या,यामुळे एकाच मालमत्तेची घरपट्टी व प्लॉटपट्टीच्या नोंदी  अशा दुबार नोंदी झाल्या.

वास्तविक पहाता या मालमत्तेवर तत्कालीन ग्रामपंचायतीपासुन घरपट्टीच्या नोंदी होत्या परंतु खुल्या भुखंडाच्या नोंदी घेता वेळी त्यावर इमारत बांधकाम आहे की नाही याची खातरजमा न कारता खुल्या भुखंडाची नोंदी काही अशी घेण्यात आल्या त्यामुळे दुबार झालेल्या नोंदीची प्लॉट पट्टी  ही वसुन न होणारी असल्याने व चुकीचे आकारणी झालेल्या प्लॉट पट्टीच्या नोंदी रद्द करव्या लागतील यांचा तपशील सोबत जोडलेल्या दुबार नोदी यादी मध्ये देण्यात आलेला आहे.

सोबत जोडलल्या दुबार नोंदी ची यादी त्यामध्ये दर्शविलेल्या दुबार नोंद व त्यावर अदयाप पर्यत असणारी मालमत्ता कर आकारणी महाराष्ट्र महानगरपालिका,अधिनियम १९४९ कलम अन्वये प्रकरण ८ कराधान नियम २०(१)(फ)नुसार दुरूस्ती करणेस किंवा महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ अन्वये निर्लेखित करणेस व तसेच प्रस्ताव मंजूरीप्रामणे परिशिष्ट अ व रिव्हीजन रजिष्टर व संगणकांस घेणेस मंजुरी मिळणे बाबत सदरचा रिपोर्ट सविनय आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपीक व विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक विभाग प्रमुख यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ अन्वये संबंधीत मालमत्ताधारकांचे झ ाालेली डबल नोंद ,सोबत जोडलेल्या यादीनुसार ,नोंद रद्द करून थकबाकी रक्कम रू.३३,३२,३७९/- व शास्ती निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेवणे बाबत आदेशार्थ सादर.

यावर सहाय्यक मुल्या निर्धारक तथा संग्राहक अधिकारी यांचा अभिप्राय की,विभागाने सादर केलेल्या प्रस्तावा नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल प्रकरण  ८ कराधान नियम ५१ नुसार मा.आयुक्त यांना आपलया स्वेच्छानिर्णयानुसार नियम ४१ खाली शास्ती किंवा नियम ५० खालील फी किंवा वसुलीचा खर्च माफ करता येईल तसेच नियम ५१ नुसार पुर्णतः किकंवा अंशतः माफ करता येईल.

तसेच मनपा अधि १९४९ मधिल कलम १५२ नुसार वसुल न होणारी रक्कम मा.स्ाािायी समितीकडे निर्लेख्याीत करणे साठी पाठविणे योग्य होईल तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,महानगरपालिका अधिनियम कलम १५२ अन्वये डबल नोंद कमी करून रक्कम रू.३३.३२ लक्ष निर्लेखित करणेकामी स्थायी समिती कडे पाठविणेस मंजूरीसाठी सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १५२ नुसार वसुल होण्याजोगी नसेल अशी कोणतीही रक्कम मा.स्थायी समितीच्या मान्यतेने निर्लेखित करता येईल.अशी तरतुद आहे.सबब प्रस्तावात नमुद दुबार नोंदी अ व ब प्रमाणे उचित राहिल.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---**---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४ वसुली वॉर्ड क्र.३९ केडगांव विभाग मधील मालमत्ता धारकांच्या दुबार नोंदी झाल्याने त्यावरील घरपट्टीची आकारणी निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभागृहामध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.श्याम नळकांडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४ वसुली वॉर्ड क्र.३९ केडगांव विभाग मधील मालमत्ता धारकांच्या दुबार नोंदी झाल्याने त्यावरील घरपट्टीची आकारणी निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूर येत आहे. मा.आयुक्त साहेब यांच्या मान्यतेने सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात सन २०१७-२०१८ या कालावधीतील व्यपगत ठेवीच्या रक्कम रूपये ३,८६,६६,९४६.७०/- महानगरपालिका जनरल फंडात जमा करून म.न.पा. कर्मचारी यांचे महागाई भत्ता फरक व इतर देयके अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टनुसार अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४ वसुली वॉर्ड क्र.३९ केडगांव विभाग मधील मालमत्ता धारकांच्या दुबार नोंदी झाल्याने त्यावरील घरपट्टीची आकारणी निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर महानगरपालिका मा.आयुक्त साहेब यांच्या मान्यतेने सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात सन २०१७-२०१८ या कालावधीतील व्यपगत ठेवीच्या रक्कम रूपये ३,८६,६६,९४६.७०/- (अक्षरी रूपये तीन कोटी शहाऐंशी लाख सहासष्ठ हजार नउशे सेहेचाळीस पैसे सत्तर फक्त) महानगरपालिका जनरल फंडात जमा करून म.न.पा. कर्मचारी यांचे महागाई भत्ता फरक व इतर देयके अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री. श्याम नळकांडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०९**

विषय क्रमांक- १३८ सोमवार दि.०१/११/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४वसुली वॉर्ड क्र.४० केडगांव विभाग मधील मालमत्ता धारकांच्या दुबार नोंदी झाल्याने त्यावरील घरपट्टीची आकारणी निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपलिका केडगांव उपकार्याल.

विनंती रिपोर्ट वॉर्ड क्र.४० मध्ये सन २००३-०४ या अर्थिक वर्षात अहमदनगर महानगरपालिकेने मालमत्ता कर आकरणी साठी संपर्ण अहमदनगर शहरातील मिळकतीचे रिव्हीजन सर्व्हे केला होता.त्यावेळी संबंधीत रिव्हीजन ऑफिसर /असि,सिव्हीजन ऑफिसर यांनी अस्तित्वात असणा-या घरांच्या नोदी मालमत्ता कर आकारणी साठी घतल्या होत्या,त्याच बरोबार रिव्हीजन सर्वे मध्ये खुल्या भुखंडाच्या नोंदी(मोकळी प्लॉट) गाव पातळी वरिल तलाठी कार्यालय येथुन मिळकतीचे सर्व्हे नंबर व प्लॉट नंबर यांची कागदोपत्री माहिती संकलीत करून खुल्या भुखंडाच्या देखिल नोंदी घेण्यात आल्या परंतु यामध्ये ज्या मिळकतीच्या घरांच्या नोंदी मालमत्ता कर आकारणीसाठी घेण्यात आल्या त्यात काही त्याच मिळकतीच्या नोंदी खुल्या भुखंड मोकळी जागा म्हणून घेण्यात आल्या,यामुळे एकाच मालमत्तेची घरपट्टी व प्लॉटपट्टीच्या नोंदी अशा दुबार नोंदी झाल्या.
वास्तविक पहाता या मालमत्तेवर तत्कालीन ग्रामपंचायतीपासुन घरपट्टीच्या नोंदी होत्या परंतु खुल्या भुखंडाच्या नोंदी घेता वेळी त्यावर इमारत बांधकाम आहे की नाही याची खातरजमा न कारता खुल्या भुखंडाची नोंदी काही अशी घेण्यात आल्या त्यामुळे दुबार झालेल्या नोंदीची प्लॉट पट्टी ही वसुन न होणारी असल्याने व चुकीचे आकारणी झालेल्या प्लॉट पट्टीच्या नोंदी रद्द करव्या लागतील यांचा तपशील सोबत जोडलेल्या दुबार नोदी यादी मध्ये देण्यात आलेला आहे.

सोबत जोडलल्या दुबार नोंदी ची यादी त्यामध्ये दर्शविलेल्या दुबार नोंद व त्यावर अदयाप पर्यत असणारी मालमत्ता कर आकारणी महाराष्ट्र महानगरपालिका,अधिनियम १९४९ कलम अन्वये प्रकरण ८ कराधान नियम २०(१)(फ)नुसार दुरूस्ती करणेस किंवा महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ अन्वये निर्लेखित करणेस व तसेच प्रस्ताव मंजूरीप्रामणे परिशिष्ट अ व रिव्हीजन रजिष्टर व संगणकांस घेणेस मंजुरी मिळणे बाबत सदरचा रिपोर्ट सविनय आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपीक व विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक विभाग प्रमुख यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ अन्वये संबंधीत मालमत्ताधारकांची सोबत जोडलेलया यादी नुसार संबंधीत मालमत्ता धारकांची झालेली डबल नोंद रद्द करून थकबाकी रक्कम रू.८,४३,१५६/- व शास्ती निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेवणे बाबत आदेशार्थ सादर.

यावर सहाय्यक मुल्या निर्धारक तथा संग्राहक अधिकारी यांचा अभिप्राय की,विभागाने सादर केलेल्या प्रस्तावा नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल प्रकरण ८ कराधान नियम ५१ नुसार मा.आयुक्त यांना आपलया स्वेच्छानिर्णयानुसार नियम ४१ खाली शास्ती किंवा नियम ५० खालील फी किंवा वसुलीचा खर्च माफ करता येईल तसेच नियम ५१ नुसार पुर्णतः किकंवा अंशतः माफ करता येईल.

तसेच मनपा अधि १९४९ मधिल कलम १५२ नुसार वसुल न होणारी रक्कम मा.स्ाािायी समितीकडे निर्लेखीत करणे साठी पाठविणे योग्य होईल तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे दुबार नोंद रद्द करून रक्कम रू.८.४३ लक्ष निर्लेखित करणेकामी स्थायी समिती कडे पाठविणेस आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १५२ नुसार वसुल होण्याजोगी नसेल अशी कोणतीही रक्ककम मा.स्थायी समितीच्या मान्यतेने निर्लेखित करता येईल.अशी तरतुद आहे.सबब प्रस्तावात नमुद दुबार नोंदी अ व ब प्रमाणे उचित राहिल.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---**---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४वसुली वॉर्ड क्र.४० केडगांव विभाग मधील मालमत्ता धारकांच्या दुबार नोंदी झाल्याने त्यावरील घरपट्टीची आकारणी निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.सागर बोरूडे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभागृहामध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा. मा.सभापती साहेब, मागील ब-याच स्थायी समितीच्या बैठकी मध्ये जाहिरात बोर्ड बाबत चर्चा झालेली आहे.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर शहरात किती जाहिरात बोर्ड आहेत.

जाहिरात विभाग क्लार्क श्री.देशमुख :- महानगरपालिकेने ७१ जाहिरात बोर्ड करीता परवानगी दिलेली आहे.

मा.श्री.सागर बोरूडे :- सध्या या बोर्ड चे काम कोणत्या ठेकेदार एजन्सी कडे आहे.

जाहिरात विभाग क्लार्क श्री.देशमुख :- मे.चंगेडीया आउट डोअर अॅड. प्रा.ली.या ठेकेदार एजन्सी कडे आहे.

मा.सभापती साहेब :- मे.चंगेडीया आउट डोअर अॅड. प्रा.ली.या ठेकेदार एजन्सी ने आजच सभेमध्ये अर्ज देवून मुदतवाढ मिळणे करीता मागणी केली आहे.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- किती वर्ष मुदत वाढ आपल्याला देता येईल.

जाहिरात विभाग क्लार्क श्री.देशमुख :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ जाहिरात व फलक नियंत्रण २००३ तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र दि. २१ जुन २०१४ मधील कलम ७९,२८ (ड) नुसार दोन वर्षासाठी परवानगी देता येईल.

मा.श्री.सागर बोरूडे :- विषयपत्रीकेवरील निर्लेखित करण्यास ऑफिस रिपोर्टला मान्यता देण्यात यावी.व सध्या कार्यरत असलेले मे.चंगेडीया आउट डोअर अॅड. प्रा.ली. यांना ७१ होर्डीग बोर्डाना दोन वर्षा करीता मुदतवाढ देण्यात यावी.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा. महानगरपालिकेने ७१ जाहिरात बोर्ड करीता परवानगी दिलेली असून सध्या फक्त २७ ठिकाणी जाहिरात बोर्ड लावण्यात आलेले आहेत.तांत्रिक बाबींचा अडथळा असल्या मुळे जाहिरात बोर्ड न लागल्याने जाहिरात कर म.न.पा.स मिळत नाही. अहमदनगर महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने सदरची बाब महानगरपालिकेच्या हिताची असल्याने महानगरपालिकेने व ठेकेदार संस्था यांनी सर्व्हे करून इतरत्र पर्यायी जागा उपलब्ध्द करून दयावी. ७१ होर्डीग बोर्डाना दोन वर्षा करीता मुदतवाढ देण्यात येवून त्यांच्या भाडयामध्ये २०% भाडेवाढ करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४वसुली वॉर्ड क्र.४० केडगांव विभाग मधील मालमत्ता धारकांच्या दुबार नोंदी झाल्याने त्यावरील घरपट्टीची आकारणी निर्लेखित मंजूर करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. सभागृहात सभेमध्ये श्री.आदेश राजमल चंगेडीया यांची संस्था मे.चंगेडीया आउट डोअर ॲड. प्रा.ली..यांचा प्राप्त अर्ज व त्यावर झालेल्या चर्चे नुसार महानगरपालिकेने ७१ जाहिरात बोर्ड करीता परवानगी दिलेली असून सध्या फक्त २७ ठिकाणी जाहिरात बोर्ड लावण्यात आलेले आहेत.तांत्रिक बाबींचा अडथळा असल्या मुळे जाहिरात बोर्ड न लागल्याने जाहिरात बोर्ड जागा भाडे म.न.पा.स मिळत नाही. अहमदनगर महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने सदरची बाब महानगरपालिकेच्या हिताची असल्याने महानगरपालिकेने व ठेकेदार संस्था यांनी सर्व्हे करून इतरत्र पर्यायी जागा उपलब्ध्द करून दयावी. मे.चंगेडीया आउट डोअर ॲड. प्रा.ली. यांना पुढील दोन वर्षाकरीता मुदतवाढ देवून २०% भाडेवाढ करून महाराष्ट्र शासन राजपत्र २१ जुन २०१४ अन्वये कार्यालयीन अटी व शर्ती प्रमाणे मुदतवाढ व भाडेवाढ करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टनुसार अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४वसुली वॉर्ड क्र.४० केडगांव विभाग मधील मालमत्ता धारकांच्या दुबार नोंदी झाल्याने त्यावरील घरपट्टीची आकारणी निर्लेखित मंजूर करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. सभागृहात सभेमध्ये श्री.आदेश राजमल चंगेडीया यांची संस्था मे.चंगेडीया आउट डोअर ॲड. प्रा.ली..यांचा प्राप्त अर्ज व त्यावर झालेल्या चर्चे नुसार महानगरपालिकेने ७१ जाहिरात बोर्ड करीता परवानगी दिलेली असून सध्या फक्त २७ ठिकाणी जाहिरात बोर्ड लावण्यात आलेले आहेत.तांत्रिक बाबींचा अडथळा असल्या मुळे जाहिरात बोर्ड न लागल्याने जाहिरात बोर्ड जागा भाडे म.न.पा.स मिळत नाही. अहमदनगर महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने सदरची बाब महानगरपालिकेच्या हिताची असल्याने महानगरपालिकेने व ठेकेदार संस्था यांनी सर्व्हे करून इतरत्र पर्यायी जागा उपलब्ध्द करून दयावी. बोर्डाचे माप मोठे होउ शकत असेल ते बोर्ड मोठे करावे. त्यानुसार वाढीव भाडे आकारण्यात यावे. जस जसे नविन जाहिरात बोर्डलागतील त्यानुसार महानगरपालिकेस कळविण्यात यावे. मे.चंगेडीया आउट डोअर ॲड. प्रा.ली. यांना पुढील दोन वर्षाकरीता मुदतवाढ देवून २०% भाडेवाढ करून महाराष्ट्र शासन राजपत्र २१ जुन २०१४ अन्वये कार्यालयीन अटी व शर्ती प्रमाणे मुदतवाढ व भाडेवाढ करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. सागर बोरूडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.प्रकाश भागानगरे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०९**

विषय क्रमांक- १३९ सोमवार दि.०१/११/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४ वसुली वॉर्ड क्र.३४ केडगांव विभाग मधील मालमत्ता धारकांच्या दुबार नोंदी झाल्याने त्यावरील घरपट्टीची आकारणी निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका केडगांव उपकार्यालय

विनंती रिपोर्ट वॉर्ड क्र.३४ मध्ये सन २००३-०४ या अर्थिक वर्षात अहमदनगर महानगरपालिकेने मालमत्ता कर आकरणी साठी संपर्ण अहमदनगर शहरातील मिळकतीचे रिव्हीजन सर्व्हे केला होता.त्यावेळी संबंधीत रिव्हीजन ऑफिसर /असि,सिव्हीजन ऑफिसर यांनी अस्तित्वात असणा-या घरांच्या नोदी मालमत्ता कर आकारणी साठी घतल्या होत्या,त्याच बरोबार रिव्हीजन सर्वे मध्ये खुल्या भुखंडाच्या नोंदी(मोकळी प्लॉट) गाव पातळी वरिल तलाठी कार्यालय येथुन मिळकतीचे सर्व्हे नंबर व प्लॉट नंबर यांची कागदोपत्री माहिती संकलीत करून खुल्या भुखंडाच्या देखिल नोंदी घेण्यात आल्या परंतु यामध्ये ज्या मिळकतीच्या घरांच्या नोंदी मालमत्ता कर आकारणीसाठी घेण्यात आल्या त्यात काही त्याच मिळकतीच्या नोंदी खुल्या भुखंड मोकळी जागा म्हणून घेण्यात आल्या,यामुळे एकाच मालमत्तेची घरपट्टी व प्लॉटपट्टीच्या नोंदी अशा दुबार नोंदी झाल्या.

वास्तविक पहाता या मालमत्तेवर तत्कालीन ग्रामपंचायतीपासुन घरपट्टीच्या नोंदी होत्या परंतु खुल्या भुखंडाच्या नोंदी घेता वेळी त्यावर इमारत बांधकाम आहे की नाही याची खातरजमा न कारता खुल्या भुखंडाची नोंदी काही अशी घेण्यात आल्या त्यामुळे दुबार झालेल्या नोंदीची प्लॉट पट्टी ही वसुन न होणारी असल्याने व चुकीचे आकारणी झालेल्या प्लॉट पट्टीच्या नोंदी रद्द करव्या लागतील यांचा तपशील सोबत जोडलेल्या दुबार नोदी यादी मध्ये देण्यात आलेला आहे.

सोबत जोडलल्या दुबार नोंदी ची यादी त्यामध्ये दर्शविलेल्या दुबार नोंद व त्यावर अदयाप पर्यत असणारी मालमत्ता कर आकारणी महाराष्ट्र महानगरपालिका,अधिनियम १९४९ कलम अन्वये प्रकरण ८ कराधान नियम २०(१)(फ)नुसार दुरूस्ती करणेस किंवा महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ अन्वये निर्लेखित करणेस व तसेच प्रस्ताव मंजूरीप्रामणे परिशिष्ट अ व रिव्हीजन रजिष्टर व संगणकांस घेणेस मंजुरी मिळणे बाबत सदरचा रिपोर्ट सविनय आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपीक व विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक विभाग प्रमुख यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ अन्वये संबंधीत मालमत्ताधारकांची सोबत जोडलेलया यादी नुसार संबंधीत मालमत्ता धारकांची झालेली डबल नोंद रद्द करून थकबाकी रक्कम रू.८,८८,२२२/- व शास्ती निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेवणे बाबत आदेशार्थ सादर.

यावर सहाय्यक मुल्या निर्धारक तथा संग्राहक अधिकारी यांचा अभिप्राय की,विभागाने सादर केलेल्या प्रस्तावा नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल प्रकरण ८ कराधान नियम ५१ नुसार मा.आयुक्त यांना आपलया स्वेच्छानिर्णयानुसार नियम ४१ खाली शास्ती किंवा नियम ५० खालील फी किंवा वसुलीचा खर्च माफ करता येईल तसेच नियम ५१ नुसार पुर्णतः किकंवा अंशतः माफ करता येईल.

तसेच मनपा अधि १९४९ मधिल कलम १५२ नुसार वसुल न होणारी रक्कम मा.स्ााियी समितीकडे निर्लेखीत करणे साठी पाठविणे योग्य होईल तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे सहाय्यक मुल्य निर्धारक व संग्राहक ,प्रभाग अधिकारी यांचे प्रस्ताव मान्यतेस्त.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,मुख्यलेखापरिक्षक यांचे कडून तपासून घेणे.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १५२ नुसार वसुल होण्याजोगी नसेल अशी कोणतीही रक्ककम मा.स्थायी समितीच्या मान्यतेने निर्लेखित करता येईल.अशी तरतुद आहे.सबब प्रस्तावात नमुद दुबार नोंदी अ व ब प्रमाणे उचित राहिल.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---**---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४ वसुली वॉर्ड क्र.३४ केडगांव विभाग मधील मालमत्ता धारकांच्या दुबार नोंदी झाल्याने त्यावरील घरपट्टीची आकारणी निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. आहे.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभागृहामध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.श्याम नळकांडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४ वसुली वॉर्ड क्र.३४ केडगांव विभाग मधील मालमत्ता धारकांच्या दुबार नोंदी झाल्याने त्यावरील घरपट्टीची आकारणी निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टनुसार अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४ वसुली वॉर्ड क्र.३४ केडगांव विभाग मधील मालमत्ता धारकांच्या दुबार नोंदी झाल्याने त्यावरील घरपट्टीची आकारणी निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री. श्याम नळकांडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०९**

विषय क्रमांक- १४० सोमवार दि.०१/११/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेची तत्कालीन शहर बससेवा यशवंत ऑटो प्रा.ली.यांचे स्थगित ठेवलेली थकीत अनुदान रक्कम त्यांना परत करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका मोटार व्हेईकल विभाग

संदर्भ : १) यशवंत ऑटो प्रा.लि. यांचे दि. ११/१२/२०१९ चे पत्र
२) यशवंत ऑटो प्रा.लि. यांचे दि. २३/०८/२०२१ चे पत्र
३) मा. महासभा प्रस्ताव क्र. १० दि. ०५/०७/२०१४ तोटा व नुकसान व भरपाई देणे बाबतचा प्रस्ताव
४) मा. स्थायी समिती सभा क्र. ४ प्रस्ताव क्र. ३३ दि. २८/०८/२०१७ तोटा व नुकसान व भरपाई देणे बाबतचा प्रस्ताव
५) यशवंत ऑटो प्रा.लि. व अहमदनगर म.न.पा. यांचे मधील करार
६) यशवंत ऑटो प्रा.लि. अहमदनगर यांचा, मा. सभापती, स्थायी समिती यांना अग्रेषित दि. २३/०८/२०२१ चा विनंती अर्ज
७) मे.यशवंत ऑटो प्रा.लि.यांचे मा. आयुक्त, म.न.पा. यांस दि.१२/१०/२०२१ चे पत्र

मा. सादर,

संदर्भिय क्र. ४ व ५ अन्वये तत्कालीन अभिकर्ता संस्थेने शहर बससेवे बाबतची थकीत तोटा व नुकसान भरपाई मिळणे बाबत मागणी केलेली आहे. संदर्भिय पत्रानुसार कामगारांचे थकीत पगार दुकानदारांची देणी, शासकीय कर, कर्मचारी प्रॉ. फंड इत्यादी देणी दिलेली असून संस्थेने इतर ठिकाणावरून रक्कम उभी करून देणी दिलेली आहेत. संस्था डब- घाईस असल्याने व म.न.पा. कडे रक्कम बाकी असल्याने तसेच कोर्टातील केस देखील मागे घेण्यात येईल, संस्थे वरील कर्ज रक्कम थकीत देता येईल यासाठी थकीत अनुदान तोटा व नुकसान भरपाई रक्कम रू. ८८.०० लाख संस्थेस अदा करणे बाबत पत्र प्राप्त झालेले आहे. सदर पत्रावर मा.सभापती, स्थायी समिती यांनी योग्य त्या कार्यवाही साठी, मा. आयुक्त यांचेकडे पत्र दिले असता, मा.आयुक्त यांनी सदरचे पत्र वाहन विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविलेले आहे.

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार सादर करण्यात येते की, अहमदनगर शहर बससेवा परिवहन उपक्रम तत्कालीन अभिकर्ता संस्था मे. यशवंत ऑटो प्रा.लि. अहमदनगर या संस्थेची नेमणूक करून शहरात नागरिकांचे प्रवासाचे सोायीसाठी चालविण्यास दिलेला होता. सदरचा उपक्रम १० वर्षा करिता होता, उपक्रमाअंतर्गत अहमदनगर म.न.पा. व यशवंत ऑटो प्रा.लि. यांचेमध्ये शहर बस सेवे संदर्भात अटी शर्ती नुसार करार झालेला आहे. यशवंत ऑटो प्रा.लि. या संस्थेने शहर बससेवा परिवहन उपक्रम दि. ०६/०१/२०१५ ते दि.१८/०३/२०१८ पर्यंत चालविला होता. परंतू सदर उपक्रम संस्थेने एकतर्फी बंद करून कराराचा भंग केलेला आहे.

शहर बससेवा परिवहन उपक्रमाअंतर्गत म.न.पा. ने मा. स्थायी समितीच्या ठरावान्वय अभिकर्ता संस्था यशवंत ऑटो प्रा.लि. नेमणूक केली होती. बससेवा कार्यरत असताना बसेसला येणा-या तोटया नुसार म.न.पा. ने बससेवा सुरळीत चालू रहावी, यासाठी करारा नुसार तसेच मा. महासभा प्रस्ताव क्र. १० दि. ०५/०७/२०१४ अन्वये तोटा व नुकसान भरपाई रक्कम रू. ५.०० लक्ष दरमहा मंजूर करण्यात आलेली आहे. व तदनुसार माहे जानेवारी २०१५ ते माहे ऑक्टोबर २०१६ कालावधीतील तोटा व नुकसान भरपाईची होणारी रक्कम रू. ९८.०० लाख इतकी अभिकर्ता संस्थेस अदा केलेले आहेत.

परंतू सदर संस्थेने वेळोवेळी कराराचा भंग केल्याने पत्र देवूनही, मिटींगमध्ये सुचना देवूनही बससेवेत सुधारणा न केल्याने महानगरपालिकेने तोटा व नुकसान भरपाई रक्कम देणे बंद केले होते. याबाबत सदर संस्थेने विनंती केल्याप्रमाणे मा. स्थायी समिती सभा क्र. ४ विषय क्र. ३३ दि. २८/०८/२०१७ अन्वये रक्कम देणे बाबत ठराव पारीत केला होता. तथापी तत्कालीन अभिकर्त्याने कराराचा पूर्णतः भंग केल्याने, बससेवेतील शासकीय देणी दिलेली नसल्याने तसेच सदर संस्थेने मा.न्यायालयात म.न.पा. विरूध्द दावा दाखल केला असल्याने म.न.पा. ने सदरची तोटा नुकसान भरपाईची देय रक्कम देणे स्थगित ठेवली होती. दरम्यानच्या काळात संस्थेने म.न.पा.स विश्वासात न घेता कराराचा भंग करून एकतर्फी बससेवा पूर्णतः बंद केली होती. नविन बससेवा सुरू करणे कामी पुनश्च महत - प्रयास करावे लागले आहेत.

सदरचे प्राप्त पत्र पाहता माहे नोव्हे. २०१६ ते मार्च २०१८ पर्यंतची तोटा व नुकसान भरपाईची रक्कम रू. ८८.०० लाख इतकी थकीत असून स्थगित ठेवलेली आहे. त्याचप्रमाणे स्थगित अनुदान रक्कम, थकीत स्वामित्वधन महानगरपालिकेचे उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे भरलेली रक्कम, दंडनीय रक्कम इत्यादी बाबत खालील तक्त्यात नमूद करण्यात आले आहे.

| **बससेवेस म.न.पा.ने तोटा / नुकसान भरपाईची दिलेली रक्कम** | **बससेवेतून म.न.पा.ला मिळालेले स्वामित्वधन** | **बससेवेस स्थगित ठेवलेली तोटा नुकसान भरपाईची रक्कम** | **बस सेवेतील थकीत स्वामित्वधन (म.न.पा. स येणे बाकी )** | **बाल पोषण/ प्रवासी करापोटी म न पा ने आर. टी ओ विभागाकडे भरलेली रक्कम** | **बसेस बाबतची दंडनीय रक्कम** | **तोटा नुकसान भरपाई पोटी येणारी रक्कम** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| (करारनामा बाब क्र. १४ नुसार) जाने. २०१५ ते ऑक्टो.२०१६ पर्यंत | (करारनामा बाब क्र. ४ नुसार) जाने. २०१५ ते ऑक्टो.२०१६ | (करारनामा बाब क्र. १४ नुसार) व संबधीत संस्थेने सादर केलेल्या कागदपत्रानुसार स्थगित ठेवणेत आलेली रक्कम माहे नोव्हे. २०१६ ते मार्च २०१८ पर्यंत | (करारनामा बाब क्र. ४ नुसार) माहे नोव्हेबर २०१६ ते मार्च २०१८ पर्यंत | उपप्रादेशिक यांचे दि.२३/०५/२०१९ चे पत्रान्वये थकीत प्रवासी/बाल पोषण कर रू.२३,९७,६३४/- पैकी म.न.पा. - रू.१९,१८,१३१/- भरले व भरणे बाकी | (करारनामा बाब क्र. २१ नुसार) प्रति दिन/बस रू.१०००/- प्रमाणे अभिकत्याने सादर केलेल्या कागद पत्रानुसार व बंद बसेस नुसार नोव्हे.२०१६ ते मार्च २०१८ पर्यंत | **कॉलम ३ -** **(**कॉलम ४ + कॉलम ५ + कॉलम ६**)** = ८५,००,००० **-** **(**२,९७,००० + २३,९७,६३४ + ३०,३४,०००**)** = रू.२७,७१,३६६/- |
| रू.९७,७०,९२१/- | रू.३,५६,०००/- | रू.८५,००,०००/- | रू.२,९७,०००/- | रू.४,७९,५३३/- | रू.३०,३४,०००/- | |

सदर संस्थेच्या पत्रानुसार संस्थेने तत्कालीन बससेवेतील बसेस बाबतचे संपूर्ण दायित्वे (दुकानदारांची देणी, कर्मचारी वेतन व फंड ईत्यादी) अदा केलेली असून म.न.पा. विरूध्द मे न्यायालयात केलेला दावा देखील मागे घेण्याची तयारी दर्शविली आहे. सबब सदर तत्कालीन अभिकर्ता संस्थेची थकीत रक्कमेस स्थगिती असून कराराचा भंग केल्याने व बससेवा एकतर्फी बंद केल्याने सदर संस्थेस दंडात्मक कारवाई करून तसेच अभिकर्ता संस्थेचे दायित्व उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडील थकीत करांची रक्कम म.न.पा. ने अदा केलेली असून सदरची कपात करणेत येवून रक्कम देणे बाबतचा निर्णय घेणे उचित ठरेल, असे वाटते.

उक्त तक्त्यानुसार शहर बससेवे बाबत नमूद करण्यात आलेले आहे. प्रस्तावा मध्ये नमूद बाबींचा विचार होवून निर्णय घेणे असल्याने सदरची बाब धोरणात्मक व आर्थिक स्वरूपाची असल्याने वरिष्ठ स्तरावर निर्णय होणे उचित राहिल. तक्त्यात नमूद केलेल्या रक्कमे मध्ये लेखा परिक्षणामध्ये दंडनीय रक्कमे बाबत फरक पडू शकतो.

यास्तव तत्कालीन अभिकर्ता संस्था मे. यशवंत ऑटो प्रा.लि. अहमदनगर यांची बससेवे बाबतची थकीत/ स्थगित तोटा व नुकसान भरपाई रक्कम देणे बाबतची कार्यवाही तथा धोरणात्मक निर्णय घेणे कामी सदरचा प्रस्ताव पुढील आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे वरिष्ठ लिपीक मोटर व्हेईकल विभाग यांचा अहवाल असे.

यावर मा.मेकॅनिकल इंजी.यांचा अभिप्राय की,मनपा शहर बससेवा तत्कालीन अभिकर्ता संस्था मे.यशवंत ऑटो प्रा.ली.अहमदनगर यांनी तोटा नुकसान भरपाई चे थकीत रक्कम परत मिळणे बाबत संदर्भीय पत्रान्वये केलेली विनंती ,त्यावर मा.सभापती स्थायी समिती ,मा.आयुक्त यांनी दिलेले निर्देश यास्तव मो.व्हे.विभागामार्फत वरील प्रमाणे तोटा नुकसान स्थगित रकमेबाबत वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

तत्कालीन अभिकर्ता संस्था मे.यशवंत ऑटो प्रा.ली.अहमदनगर यांना स्थगीत तोटा नुकसान भरपाई परत करणे बाबतची बाब ही आर्थिक / धारणात्मक स्वरूपाची असल्याने व सदर बाबत न्यायालयीन प्रक्रिया चालू असल्याने सदर बाबत मा.स्थायी समितीकडे वरील प्रमाणे अहवाल पुढील निर्णयार्थ सादर करणे योग्य राहिल,आदेशार्थ सादर.

१.वरिष्ठ लिपीक ,मोटार व्हेईकल विभाग व जल अभियंता यांनी प्रस्तावात अभिकर्तासंस्था यांनी वेळोवेळी कराराचा भंग केल्याचे स्पष्ट पणे नमुद केले आहे.अभिकर्ता संस्था यांचे कडून रकाना क्र.७ मध्ये स्वमित्वधन दंडनिय आकार आणी आर.टी.ओ.विभागाकडे भरलेली /भरावयाची रक्कम येणे दर्शविलेली आहे.

२.अभिकर्ता संस्थेने मनपा विरूध्द मा.न्यायालयात दाव दाखल केल्याचे नमुद असून सध्यस्थिती दर्शक अहवाल नमुद नाही.

३.अभिकर्ता संस्थेस कीती नुकसान भरपाई रक्कम सद्यस्थितीत देय आहे या बाबत प्रस्तावात स्वयंस्पष्ट अभिप्राय नोंदवलेले नाहीत.

विभागाने उपरोक्त बाबींची खात्री करून अभिकर्ता संस्था यांच्या नुकसान भरपाईच्या रकमेबाबत प्रस्तावित अ प्रमाणे कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,जलअभियंता समक्ष चर्चा करा.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, चर्चा केली,मुलेप यांचे अभिप्रायानुसार अभिकर्ता संस्थेने विड्रॉल करून अहवाल दिल्याने मुलेप यांनी प्रस्तावीत केलेनुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,मुळ प्रस्तावातील अ प्रमाणे आर्थिक बाबींचा धोरणात्मक निर्णय घेणेसाठी प्रसताव मा.स्थायी समितीच्या निर्णयासाठी सादर.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---**---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेची तत्कालीन शहर बससेवा यशवंत ऑटो प्रा.ली.यांचे स्थगित ठेवलेली थकीत अनुदान रक्कम त्यांना परत करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट चे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- या विषयाची सविस्तर माहिती सांगा.

मेकॅनिकल इंजी.श्री.निकम :- अहमदनगर महानगरपालिकेमार्फत शहर बसवाहतूक ही अभिकर्तासंस्थेमार्फत चालविण्यात येते.सन २०१५ ते २०१८ पर्यत मे.यशवंत ॲटो प्रा.ली.यांच्या मार्फत आपण शहर बससेवा चालवित होतो.त्याकाळामध्ये शहर बस वाहतूकीमध्ये त्याना जर तोटा झाला तर रक्कम रू.५लाखापर्यत नुकसान भरपाई देणे बाबत करारनाम्यामध्ये नमुद होते.त्यानुसार आपण त्यांना जानेवारी २०१५ ते ऑक्टोबर २०१६ पर्यतचा तोटा भरपाईची रक्कम अदा केली आहे.त्यांचा तोटा रक्कम ९७ लाखापर्यतची आहे.त्या अभिकर्ता संस्थेने जी सर्व्हिस दयायला पाहीजे होती त्या पध्दतीची सर्व्हिस त्यांनी दिली न गेल्यामुळे तत्कालीन स्थायी समितीमध्ये चर्चा झाली.सुरूवातीला नोव्हेंबर २०१६ ते मार्च २०१८ पर्यत त्यांची तोटा नुकसान भरपाईची रक्कम आपण त्यांना अदा केलेली नाही.त्यानंतर त्यांनी मार्च २०१८ मध्ये सेवा बंद केली.त्यानंतर त्यांनी आपल्याला तोटा भरपाईची रक्कम मागीतली.परंतु आपण ती अदा केलेली नाही.त्यांनतर संबंधीत संस्था मे.यशवंत ॲटो प्रा.ली. ही संस्था यांनी थकीत तोटा नुकसान भरपाई मिळणेबाबत न्यायालयामध्ये दावा दाखल केला. परंतु त्यावर अदयापपर्यत काही तोडगा निघालेला नाही. सद्यस्थितीत दावा चालू आहे.त्यांनी आपल्याला पत्र दिले आहे की,मी दावा मागे घेतो.माझी तोटा भरपाईची रक्कम मला परत देण्यात यावी.त्याअनुषंगाने आपण रिपोर्ट सादर केला आहे.

मा.श्री.सचिन शिंदे :- जो पर्यत निर्णय होत नाही तो पर्यत पेंडीग ठेवण्यात यावे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- त्यांनी आपल्याला पत्र दिले आहे का ,रक्कम दिल्यास मी दावा मागे घेण्यास तयार आहे.

मेकॅनिकल इंजी.श्री.निकम :- हो तसे पत्र दिले आहे.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :-अभिकर्ता संस्थेने बससेवेबाबत मा.न्यायालयामध्ये दाखल केलेला दावा विना अटी व शर्ती प्रमाणे मागे काढून घेण्यात यावा.

मा.श्री.मनोज कोतकर :- संबंधीत अभिकर्त्याकडून तत्कालीन बससेवेबाबतची भविष्यात काहीही आर्थिक किंवा कायदेशीर बाबींची जबाबदारी अभिकर्तासंस्थेची राहील.याबाबत तसे प्रतिज्ञापत्र घ्या.

मा.श्री.मुदस्सर शेख :- कोर्ट ने व्याजासहीत रक्कम देण्याचा निर्णय दिला तर महानगरपालिकेचे नुकसान होणार आहे.

मा.सभापती साहेब :- बरोबर आहे,कोर्टाने व्याजासह रक्कम देण्याचा निर्णय दिला तर महानगरपालिकेचे आर्थीक नुकसान होईल.

मा. श्री. मुदस्सर शेख :- जर केस विड्रॉल करीत असेल तर तोटा भरपाई देण्यात हरकत नाही.

मेकॅनिकल इंजी.श्री.निकम :- हो केस विड्रॉल करतील,तसे पत्र दिले आहे.

मा.श्री. समद खान :- बससेवे बाबतचे दायीत्वे व उपप्रदेशीक यांचे कडील मनपाने भरलेले प्रवासी व बालपोषन कर,बसचे होणारे स्वामीत्व धन किंवा इतर दायीत्वे वजा करूनच तोटा व नुकसान भरपाई करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेची तत्कालीन शहर बससेवा यशवंत ऑटो प्रा.ली.यांचे स्थगित ठेवलेली थकीत अनुदान रक्कम त्यांना परत करणे बाबतचा याबाबत सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार तत्कालीन अभिकर्ता संस्था मे.यशवंत ऑटो प्रा.ली.यांनी मा.महासभा दि.०५/०७/१४ व मा.स्थायी समिती सभा क्र.४ विषय क्र.३३ दिनांक २८/०८/२०१७ तसेच महानगरपालिका व अभिकर्ता यांच्या मधील झालेल्या करारनाम्यानुसार तोटा व नुकसान भरपाई देणे बाबत मंजूरी आहे.तत्कालीन अभिकर्ता संस्थेची तोटा व नुकसान भरपाई रक्कम स्थगित ठेवण्यात आलेली होती. याबाबत सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार,तत्कालीन अभिकर्ता संस्था मे.यशवंत ऑटो प्रा.ली.यांची बस सेबे बाबत स्थगित ठेवण्यात आलेली रक्कम देणे बाबत मंजूरी देण्यात येत आहे.तथापी बससेवे बाबतचे दायीत्व उपप्रादेशीक परिवहन विभाग यांचे कडे महानगरपालिकेने भरलेली प्रवासी व बालसंगोपन कराची रक्कम,बसेसचे होणारे स्वामीत्वधन किंवा इतर दयीत्वे वजा करूनच तोटा नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्याची कार्यवाही करावी.अभिकर्ता संस्थेने मा.न्यायालयात या संदर्भात दाखल केलेला दावा विनाअटी-शर्ती प्रमाणे मागे काढून घेण्यात यावा.संबंधित अभिकर्त्या कडून तत्कालीन बससेवे बाबतचे भविष्यात काही आर्थिक / कायदेशीर बाबी निघाल्यास त्याची जबाबदारी त्या संस्थेची राहील. या बाबत संबंधीत संस्थेकडून प्रतिज्ञापत्र करून घेण्यात यावे. संबंधित अभिकर्त्याने शहर बससेवा परिवहन उपक्रम दिनांक ६/१/२०१५ ते १८/०३/२०१८ अखेर चालविला होता.परंतु सदयस्थितीत उपक्रम राबविणे जीकरीचे असल्याने व्याजाची रक्कम ,इंधनाचे दर,स्पेअर पार्ट,कर्मचारी पगार,भविष्य निर्वाह निधी,शासकीय कर इ.बाबींचा विचार करता तसेच इतर यंत्रणाकडील बससेवा देखील तोटयात असल्याचे निदर्शनास आले असून या बाबत सांगोपांग विचार व चर्चा करता बससेवा तोटयात असल्याचे निदर्शनास आले आसून संबंधीत संस्थेस करारनाम्यानुसार आकारण्यात आलेला दंड रद्द / माफ करण्यात येत असून येणा-या दंडाबाबतची संपुर्णतः सुट देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेची तत्कालीन शहर बससेवा यशवंत ऑटो प्रा.ली.यांचे स्थगित ठेवलेली थकीत अनुदान रक्कम त्यांना परत करणे बाबतचा प्रस्तावावर सभागृहात सभेमध्ये झालेल्या साधक बाधक चर्चो नुसार पुढिल प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

तत्कालीन अभिकर्ता संस्था मे.यशवंत ऑटो प्रा.ली.यांनी मा.महासभा दि.०५/०७/१४ व मा.स्थायी समिती सभा क्र.४ विषय क्र.३३ दिनांक २८/०८/२०१७ तसेच महानगरपालिका व अभिकर्ता यांच्या मधील झालेल्या करारनाम्यानुसार तोटा व नुकसान भरपाई देणे बाबत मंजूरी आहे.तत्कालीन अभिकर्ता संस्थेची तोटा व नुकसान भरपाई रक्कम स्थगित ठेवण्यात आलेली होती.

१)तत्कालीन अभिकर्ता संस्था मे.यशवंत ऑटो प्रा.ली.यांची बस सेबे बाबत स्थगित ठेवण्यात आलेली रक्कम अदाकरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

तथापी

२)बससेवे बाबतचे दायीत्व जसे की, उपप्रादेशीक परिवहन विभाग यांचे कडे महानगरपालिकेने भरलेली प्रवासी व बालसंगोपन कराची रक्कम,बसेसचे होणारे स्वामित्वधन किंवा इतर दायित्व वजा करूनच तोटा नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्याची कार्यवाही करावी.

३)अभिकर्ता संस्थेने मा.न्यायालयात या संदर्भात दाखल केलेला दावा विनाअटी-शर्ती प्रमाणे मागे काढून घेण्यात यावा.

४)संबंधित अभिकर्त्या कडून तत्कालीन बससेवे बाबतचे भविष्यात काही आर्थिक / कायदेशीर बाबी निघाल्यास त्याची जबाबदारी त्या संस्थेची राहील, या बाबत संबंधीत संस्थेकडून प्रतिज्ञापत्र करून घेण्यात यावे.

५)संबंधीत अभिकर्त्याने शहर बस सेवा उपक्रम दि.०६/०१/२०१५ ते १८/०३/२०१८ अखेर चालविला होता.मात्र त्यावेळच्या स्थितीत उपक्रम राबविणे जिकरीचे असल्याने जसे की, इंधन,स्पेअरपार्ट ,कर्मचारी पगार,निर्वाह भत्ता निधी इ.बाबींचा विचार करता तसेच इतर शहरातील महानगरपालिकांकडील बस सेवा देखील तोटयात असल्याचे निदर्शनास आणून दिल्याने या बाबत सांगोपांग विचार होवून बससेवा तोटयात असल्याचे निदर्शनास आल्याने संबंधीत संस्थेस ऑफिस रिपोर्ट नुसार आकारण्यात आलेल्या दंडाची रक्कम संपुर्ण पणे माफी करण्यात येत असून संबंधीतांना लावण्यात आलेला दंड रद्द करण्यात येत आहे. त्यामुळे दंडासहची रक्कम सदर संस्थेस देण्यात यावी. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

अनुमोदक :- मा.श्री. समद खान सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०९**

विषय क्रमांक- १४१ सोमवार दि.०१/११/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** (GeM) पोर्टल वरून Back hoe loder for Processing and Disposal (JCB) २ नग जे.सी.बी.मशीन खरेदी बाबत प्रसिध्द Bid Number GEM /२०२१/B/१३६४५२० प्राप्त निविदेतील प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्त्यातील दरास मंजूरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका घन कचरा व्यवस्थापन विभाग

संदर्भ- १. मा.आयुक्त यांच्या दिनांक १४/१०/२०२१ रोजी मान्यतेनुसार नुसार

२. दि.११/१०/२०२१ रोजीच्या मा. छाननी समिती यांची शिफारसनुसार

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये प्रस्ताव देण्यात येतो की, (GeM) पोर्टल वरून Back hoe loder for Processing and Disposal (JCB) खरेदी बाबत प्रसिध्द Bid Number GEM /२०२१/B/१३६४५२० ऑनलाईन दिनांक १९/७/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

त्यानुसार सदरील प्राप्त निविदेतील तांत्रिक लिफाफा निविदा उघडण्यात आले आहे. त्यानुसार मा. तांत्रिक समिती समोर कागदपत्रांची छाननी कामी ठेवण्यात येवुन दिनांक ११/१०/२०२१ रोजी मा. तांत्रिक छाननी समितीने आर्थिक दराचा लिफाफा उघडण्याकामी शिफारस नुसार दिनांक १३/१०/२०२१ रोजी प्राप्त दोन निविदाकाराचे आर्थिक दराचा लिफाफा उघडण्यात येवुन खालील प्रमाणे तुलनात्मक दर प्राप्त झालेले आहे.

| अ.क्र. | निविदाकाराचे नाव | निविदेत निविदाकाराने भरलेले दर | लघुत्तम तपशील |
|---|---|---|---|
| १ | RATNAPPRABBHA MOTORS | प्रति जेसीबी मशीन रक्कम रू.२१,५०,०००/-प्रमाणे दोन जेसीबी मशिनकरीता रक्कम रू.४३,००,०००/- | L-१ |
| २ | JCB INDIA LTD. | प्रति जेसीबी मशीन रक्कम रू.२२,१०,०००/-प्रमाणे दोन जेसीबी मशिनकरीता रक्कम रू.४४,२०,०००/- | L-२ |

वरीलप्रमाणे अहमदनगर महानगरपालिके करीता दोन नग Back hoe loder for Processing and Disposal (JCB) खरेदी करणेकामी तुलनात्मक दृष्टया RATNAPPRABBHA MOTORS या निविदाकाराचे दर कमी असलेबाबत दिसुन येत आहे.

त्यानुसार अहमदनगर महानगरपालिके करीता दोन नग Back hoe loder for Processing and Disposal (JCB) खरेदी करणेकामी प्राप्त ई- निविदा दरानुसार प्रति Back hoe loder for Processing and Disposal (JCB) प्रति मशीन आर.टी.ओ. पासिंग व एक वर्षाचे इन्सुरंससह दर रक्कम रू.२१,५०,०००/- नुसार दोन नग Back hoe loder for Processing and Disposal (JCB) प्रति मशीन आर.टी.ओ. पासिंग व एक वर्षाचे इन्सुरंससह दर रक्कम रू.४३,००,०००/- इतका खर्च अपेक्षीत आहे.

सबब वरील प्रमाणे दरास मंजुरीस्तव व मा.स्थायी समितीची मान्यता घेणेकामी सादर करणेकामी मान्यतेस्तव सविनय सादर./अ

येणेप्रमाणे प्र.मुख्य स्वच्छता निरीक्षक यांचा अहवाल असे.

यावर घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.उपायुक्त (कर) यांची अभिप्राय की, 'अ' प्रमाणे मान्यतेसाठी

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- (GeM) पोर्टल वरून Back hoe loder for Processing and Disposal (JCB) २ नग जे.सी.बी.मशीन खरेदी बाबत प्रसिध्द Bid Number GEM /२०२१/B/१३६४५२० प्राप्त निविदेतील प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्त्यातील दरास मंजूरी मिळणे बाबतचा विषय आहे.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता (GeM) पोर्टल वरून Back hoe loder for Processing and Disposal (JCB) २ नग जे.सी.बी.मशीन खरेदी बाबत प्रसिध्द Bid Number GEM /२०२१/B/१३६४५२० प्राप्त निविदेतील प्राप्त दरानुसार खरेदी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपार्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता (GeM) पोर्टल वरून Back hoe loder for Processing and Disposal (JCB) २ नग जे.सी.बी.मशीन खरेदी बाबत प्रसिध्द Bid Number GEM /२०२१/B/१३६४५२० प्राप्त निविदेतील प्राप्त दरानुसार खरेदी करणेकामी तुलनात्मक दृष्टया कमी दराचे निविदाकार RATNAPPRABBHA MOTORS यांच्या प्रति मशीन आर.टी.ओ. पासिंग व एक वर्षाचे इन्सुरंससह असलेल्या दरास व २ नग जे.सी.बी.मशीन खरेदी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.समद खान सही/-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका